सत्यमेव जयते

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

"यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहीसावळी गावठाण येथील शेतक-यांच्या
जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमीन
संपादित करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला
मिळण्याबाबत" या विषयावरील श्री. सुभाष झांबड,वि.प.स.
यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद
विनंती अर्ज समितीचा

# अहवाल

(दिनांक जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
जुलै, २०१८

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

“ यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहीसावळी गावठाण येथील शेतक-यांच्या
जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमीन
संपादित करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला
मिळण्याबाबत ” या विषयावरील श्री. सुभाष झांबड,वि.प.स.
यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद
विनंती अर्ज समितीचा

# अहवाल

## विनंती अर्ज समिती

(२०१७-२०१८)

१. श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
२. श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
३. प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
४. श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
५. श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

*१ ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.
*२ ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
**३ प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM)
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*ॲड. रामहरी रूपनवर वि.प.स. व ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांची दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांची दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी विशेष निमंत्रित म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

# विनंती अर्ज समिती

(२०१६-२०१७)

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

(२) * श्री. गिरीष व्यास, वि.प.स.

(३) * प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(४) * श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स

**विशेष निमंत्रित**

श्री. कपिल पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. यु. के. चव्हाण, सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

* सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर वि.प.स यांची दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

" यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहीसावळी गावठाण येथील शेतक-यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमिन संपादित करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला मिळण्याबाबत " या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज महसूल व वन (वने) विभागाकडे पाठविण्यात आला. या संबंधीची माहिती महसूल व वन (वने) विभागाकडून दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ व दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, जिल्हाधिकारी,यवतमाळ व अन्य अधिका-यांच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ व २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती-अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक १७ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

**विधान भवन :**
**नागपूर,**
दिनांक १७ जुलै,२०१८.

**माणिकराव ठाकरे,**
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा
समिती प्रमुख, विनंती-अर्ज समिती.

## अहवाल

मी विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

**" यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहीसावळी गावठाण येथील शेतक-यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमीन संपादित करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला मिळण्याबाबत "** या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की, यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहीसावळी गावठाण या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता शेतजमिन संपादित करण्यात येत असून, त्यानुसार शेतीची संयुक्त मोजणी झाली आहे व शेतजमिन अधिग्रहित करण्यात येत आहे. सदर जमीन संपादित करण्याचे काम सक्षम प्राधिकारी यांचेकडे आहे. वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये शेतजमिनीचे स्वरूप बघता वेगवेगळे दर स्वतंत्रपणे नमूद केलेले आहेत. याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवे वरील जमिनीसाठी विभागनिहाय प्रति चौरस मिटरचा दर स्वतंत्रपणे नमूद केलेला आहे व याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवे वरील जमिनीसाठी नमूद असलेला प्रति चौरस मिटरचा दर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चौपदरीकरण्यासाठी संपादीत होत असलेल्या हायवे वरील शेतजमिनीसाठी निश्चित करण्याबाबत स्थानिक नागरीकांची मागणी आहे. हायवे लगतच्या ५०० मीटर पर्यंत संपादित क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मुल्य निर्धारण कार्यालयाच्या परिपत्रकानुसार त्याची अंमलबजावणी होत नाही. तरी कृपया आपण सदर विषयात लक्ष घालून महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विनंती अर्ज समितीमार्फत आमच्यावरील झालेल्या अन्यायाचे निवारण करावे व आम्हास जमिन संपादित करताना योग्य मुल्यदर आकारून मोबदला मिळण्याबाबत सहकार्य करावे अशी विनंती उक्त अर्जात केलेली आहे.

समितीच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी महसूल व वन (वने) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन अ) मध्ये असे नमूद केले आहे की, यवतमाळ जिल्ह्यातील मौजा भोसा व मौजा दहीसावळी, ता. महागांव, राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरण करण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत शेतजमिन संपादीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सद्यःस्थितीत मौजा-भोसा, ता. महागाव येथील अंदाजे १०.३६ हेक़्टर आर जमिन संपादीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी सुमारे ७.०७ हेक्टर आर क्षेत्राबाबतची कार्यवाही मुल्यांकनाच्या स्तरावर असून अद्याप त्यामध्ये अंतिम निवाडा सक्षम प्राधिकारी (CALA) यांचेमार्फत जाहीर करण्यात आलेला नाही. उर्वरीत ३.२९ हेक्टर आर क्षेत्र ३A चे आक्षेप सुनावणी करीता प्रलंबित आहे.

मौजा दहीसावळी, ता. महागाव येथील अंदाजे ८.३७ हेक्टर आर जमिन संपादीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. यापैकी सुमारे ४.३३ हेक्टर आर जमिनीच्या क्षेत्राबाबत कार्यवाही मुल्यांकनाच्या स्तरावर असून अद्याप त्यामध्ये अंतिम निवाडा सक्षम प्राधिकारी (CALA) यांचेमार्फत जाहीर करण्यात आलेला नाही. उर्वरीत ४.०४ हेक्टर आर क्षेत्र ३A चे आक्षेप सुनावणी करीता प्रलंबित आहे.

या प्रकल्पातील भूसंपादनाकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम,१९५६ व भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार अंतिम निवाडे जाहिर करण्यात येतात. भूसंपादनाचा मोबदला ठरवितांना सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व बाजारमूल्य दर तक्त्यामध्ये दिलेले जमिनीचे दर यांचा तौलनिक विचार करण्यात येतो. मोबदला ठरविताना जिरायत, हंगामी, ओलित, बागायती, अकृषीक व संभाव्य अकृषीक क्षमता या सर्व बाबी लक्षात घेऊन जमिनीचा मोबदला देण्यात येतो. सद्यस्थितीत वरील दोनही गावांमधील भूसंपादन प्रक्रियामधील अंतिम निवाडा झालेला नाही.

सदर विनंती अर्जात नमूद हायवे लगतच्या ५०० मीटर पर्यंत संपादीत क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मुल्यनिर्धारण कार्यालयाच्या परिपत्रकानुसार त्याची अंमलबजावणी होत नाही असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने सदर परिपत्रक हे नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाचे नसून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक

नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाशी संबंधित आहे. सदर परिपत्रक हे खरेदी विक्रीचे स्टँप ड्युटी करीता लागु होते.

तथापि, अर्जदारांना निवाडा मंजुरीनंतर मोबदला मान्य नसल्यास राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत अर्जदार लवादाकडे अपील करू शकतील अशी कायद्यात तरतूद आहे.

सदरहू बैठकीत सचिव, वने यांनी पुढील माहिती दिली की, यवतमाळ जिल्ह्यातून नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ जातो त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाचे भूसंपादन सध्या प्रगतीपथावर आहे. अद्याप त्याचे निवाडे जाहीर व्हावयाचे आहेत. हे निवाडे साधारणतः ऑक्टोबर, २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत जाहीर होण्याची शक्यता आहे. अजून निवाडा जाहिर व्हायचा आहे. जेव्हा निवाडा जाहिर होईल व तो शेतक-यांना पसंत पडला नाही तर त्यांना नॅशनल हायवे प्राधिकारणाकडे दाद मागता येते. ज्या कायद्याखाली भूसंपादन होत आहे त्या कायद्यातील तरतुदीप्रमाणेच निवाडा जाहिर होणार आहे. शीघ्र सिध्द गणकाचे दर त्याचबरोबर त्या भागात प्रत्यक्षात झालेले खरेदी विक्रीचे व्यवहार याची माहिती घेण्यात येऊन सहायक संचालक, नगर रचना यांच्याकडून अभिप्राय घेण्यात येतो व त्या आधारे निवाडयाचे मूल्यांकन निश्चित करुन जाहीर करण्यात येते. वाटाघाटीकरिता संपादन संस्थेची तयारी असते. राज्य शासनाचे निगोसिएशनसंबंधात धोरण आहे ते धोरण मान्य केलेले असेल तर वाटाघाटीने निवाडा जाहीर करता येतो. ग्रामीण भागातून रस्ता जात असेल तर चौपट किंमत शेतक-याला मिळावयास हवी तसेच शासनाकडे स्वतःहून जो कोणी आपली प्रॉपटी सरेंडर करत असेल तर त्याला पाचपट किंमत दिली पाहीजे. तेव्हा हा जो निकष आहे तो भूसंपादनाला लागू करुन कायद्यातील तरतुदीप्रमाणेच निवाडा जाहीर होणार आहे.

समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीच्या वेळी महसूल व वन (वने) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट- दोन ब) मध्ये नमूद केले आहे की,मौजा भोसा, ता. महागाव येथील अंदाजे क्षेत्र १०.३० हे. आर संपादित होत असून राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील कलम ३डी नुसार क्षेत्र ७.११ हे.आर.प्रसिध्द करण्यात आले. सदर प्रकरणी २५ भूधारकांना ७.०७ हे.आर. क्षेत्राचा निवाडा दि. ०६.११.२०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे. मौजे दहिसावळी येथील अंदाजे

क्षेत्र ८.०१८ हे.आर. क्षेत्र संपादन करण्याची कार्यवाही सुरु असून दिनांक ०७.०९.२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या ३डी नुसार क्षेत्र ४.३३.४५ हे.आर.क्षेत्र असून मोजणी अहवालानुसार मौजे दहिसावळी येथील गावठाण क्षेत्र सदर रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी संपादीत होत नाही. सदर प्रकरणी ४.३३.४५ हे.आर.क्षेत्रासाठीचा निवाडा दिनांक ०८.११.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. मौजे पोहंडूळ, ता. महागांव येथील एकूण ३.४७ हे.आर.क्षेत्र संपादीत होत असून त्यात गावठाणातील अंदाजे ०.१९०७ हे.आर.क्षेत्राचा समावेश आहे. याबाबत ३डी अधिसूचना दि.२२.१२.२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

या प्रकल्पातील भूसंपादनाकरिता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ नुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार अंतिम निवाडे जाहीर करण्यात येतात. भूसंपादनाचा मोबदला ठरवितांना सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व बाजारमूल्य दर तक्त्यामध्ये दिलेले जमिनीचे दर यांचा तौलनिक विचार करण्यात येतो. मोबदला ठरविताना जिरायत, हंगामी, ओलित, बागायती, अकृषीक व संभाव्य अकृषीक क्षमता या सर्व बाबी लक्षात घेऊन जमिनीचा मोबदला देण्यात येतो.

सदर विनंती अर्जात नमूद हायवे लगतच्या ५०० मीटर पर्यंत संपादित क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मूल्यनिर्धारण कार्यालयाच्या परिपत्रकानुसार त्याची अंमलबजावणी होत नाही असे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने सदर परिपत्रक हे नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाचे नसून नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाशी संबंधित असून शिघ्रसिध्द गणकाचा वापर करण्यासंदर्भात नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक , महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून ज्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत त्यांचा विचार करुन मार्गदर्शक तक्त्यामधील सूचना क्र. २९ ब प्रमाणे कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे. तथापि, अर्जदारांना निवाडा मंजूरीनंतर मोबदला मान्य नसल्यास राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत अर्जदार लवादाकडे अपील करु शकतील अशी कायद्यात तरतूद आहे.

गावठाणची भूसंपादन प्रक्रिया सुरु असून मौजे दहिसावळी येथे ४.३३ हेक्टर आर चा निवाडा जाहिर झाला आहे. गावठाणचा रेट व हायवेच्या लगतचे रेट यामध्ये खूप

तफावत आहे. गावठाण अधिनस्त शीघ्र सिद्ध गणकाचे दर कमी आहेत. हायवे लगतचे शीघ्र सिद्ध गणकाचे दर चौरस मीटरप्रमाणे असल्यामुळे जास्त आहेत. सदरील जमीन हायवेच्या लगत आहे. शीघ्र सिद्ध गणकामध्ये २९ ब या कलमाखाली एक कोष्टक दिलेले आहे. यामुळे हायवेलगतच्या जमिनीला जास्त दर देण्याची तरतूद आहे. याबाबत आजच्या विनंती अर्ज समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने संबंधित भूसंपादन अधिका-यांना स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, ५०० चौरस मीटर हायवेलगतच्या आत जमीन येत असेल तर चौरस मीटरनुसार १०० टक्के, ५०० मीटर ते १५०० चौरस मीटरवर असेल ती ८० टक्के रक्कम द्यावयाची आहे.तसेच सुरुवातीस हेक्टर व स्क्वेअरमीटर असा दर होता. सदरील जमीन हायवेलगत असल्यामुळे त्यांना स्क्वेअरमीटरचा दर प्रस्तावित केला आहे. स्क्वेअरफुटाप्रमाणे ५ पटीने यामध्ये फरक पडतो. एकरी १० लाख रूपये मिळत असतील तर स्क्वेअरमीटरने एकरी ५०-६० लाख रुपये मिळतात. हायवे लगतचे दर चौरसमीटरप्रमाणे शीघ्र सिद्ध गणकामध्ये नमूद केले आहेत. नविन रेल्वे ट्रॅक कोरडवाहू किंवा प्लेन पट्टयातून जाणार आहे. त्याला हेक्टरी रेट प्रपोज केले जातात. त्यामुळे यामध्ये तफावत जास्त दिसते.

**अभिप्राय व शिफारशीः-** “ यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहिसावळी गावठाण येथील शेतक-यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरिता जमिन संपादित करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला मिळण्याबाबत ” या विषयावरील विनंती अर्ज श्री. सुभाष झांबड, वि. प.स. यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहास सादर केला आहे. सदर विनंती अर्जात नमूद करण्यात आले आहे की, ‘मौजे भोसा दहिसावळी गावठाण, जिल्हा यवतमाळ येथील शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ चे चौपदरीकरणाकरीता शेतजमिन संपादित करण्यात येत असून त्यानुसार शेतीची संयुक्त मोजणी झाली आहे. वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये शेतजमिनीचे स्वरूप बघता वेगवेगळे दर स्वतंत्रपणे नमूद केलेले आहेत व याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमिनीसाठी विभागनिहाय प्रति चौरस मिटरचा दर स्वतंत्रपणे नमूद केलेला आहे व याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमिनीसाठी नमूद असलेला प्रति चौरस मिटरचा दर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ चौपदरीकरण्यासाठी संपादित होत असलेल्या हायवे वरील शेतजमिनीसाठी निश्चित करण्याबाबत स्थानिक नागरिकांची मागणी आहे. हायवे लगतच्या ५०० मीटर पर्यंत संपादित क्षेत्राचे दर

देण्याबाबत महाराष्ट्र नगर रचना व मुल्य निर्धारण कार्यालयाच्या परिपत्रकानुसार त्याची अंमलबजावणी होत नाही'. तरी स्थानिक शेतक-यांच्या जमिनी संपादन करताना त्यांना योग्य मोबदला मिळण्याबाबत कार्यवाही व्हावी अशी विनंती अर्जदारांनी केली आहे.

समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी नमूद केले आहे की, यवतमाळ जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ च्या चौपदरीकरणाचे जमिन संपादन करण्याचे काम सध्या सुरू आहे. मौजे भोसा, ता. महागाव येथील १०.३० हेक्टर जमिनीचे संपादन होत आहे. या जमीनीचे नॅशनल हायवे ॲक्ट १९५६ व्दारे भूसंपादन सुरू आहे.यामध्ये नियमानुसार मोबदला दिला जात आहे. १०.३० हेक्टर पैकी ७.०७ हेक्टरचे संपादन निवाडा जाहिर झालेला आहे. बाकीची निवाडा प्रक्रिया सुरू आहे. मौजे दहिसावळी येथे ४.३३ हेक्टर आर चा निवाडा जाहीर झाला आहे. उर्वरित ठिकाणचे भूसंपादन सध्या सुरू आहे.गावठाणची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. गावठाणचा दर व हायवेच्या लगतचा दर यामध्ये खूप तफावत आहे. गावठाण अधिनस्त शीघ्र सिद्ध गणकाचे दर कमी आहेत. हायवे लगतचे शीघ्र सिद्ध गणकाचे दर चौरस मीटर प्रमाणे असल्यामुळे जास्त आहेत. सदरील जमिन हायवेच्या लगत आहे. शीघ्र सिध्द गणकामध्ये २९ ब या कलमाखाली एक कोष्टक दिलेले आहे त्यामुळे हायवे लगतच्या जमिनीला जास्त दर देण्याची नियमात तरतूद आहे. याबाबत संबंधित भूसंपादन अधिका-यांना स्पष्टपणे सांगितले आहे. शीघ्र सिध्द गणकमध्ये ५०० चौरस मीटर हायवे लगतच्या आत जमीन येत असेल तर चौरस मीटरनुसार १०० टक्के ५०० मीटर ते १,५०० चौरस मीटरवर असेल तर ८० टक्के रक्कम द्यायची आहे.

**सदर प्रकल्पातील भूसंपादन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम,१९५६ नुसार करण्यात येत आहे. भूसंपादनाचा मोबदला ठरविताना सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व बाजारमूल्य दर तक्त्यामध्ये दिलेले जमिनीचे दर विचारात घेवून मोबदला ठरविताना जिरायत,हंगामी, ओलित, बागायती, अकृषीक व संभाव्य अकृषिक क्षमता जमीन या सर्व गोष्टींचा विचार करण्यात यावा असे समितीचे स्पष्ट मत आहे. अर्जदारांना निवाडा मंजूरीनंतर मोबदला मान्य नसल्यास, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम,१९५६ अंतर्गत अर्जदार लवादाकडे अपील करू शकतात तथापि, शेतक-यांना अपिलात जावे लागू नये या दृष्टीने शासनाने संबंधित शेतक-यांना योग्य मोबदला देणे आवश्यक आहे.**

अपिलात गेल्यानंतर वेळ व पैसा या दोन्हींचाही अपव्यय होत असतो. तसेच शेतकरी स्वतःची जमिन सार्वजनिक कामासाठी देत असतो म्हणजेच सार्वजनिक कामासाठी तो आपल्या जमिनीचा त्याग करीत असतो अशा वेळी त्यांना योग्य मोबदला मिळणे हा त्यांचा हक्क आहे. राज्यामध्ये ब-याचशा भूसंपादनाच्या प्रकरणांमध्ये शासनाकडून भूधारकांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला दिला जात नाही किंवा कित्येक वर्षे मोबदला मिळतही नाही त्यामुळे भूधारकांमध्ये सध्या असंतोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे शासनाकडून याबाबत खबरदारी घेणे गरजेचे आहे. भूसंपादनाच्या प्रकरणांमध्ये शासनाने वेळीच खबरदारी घेतली नाही तर यापुढे वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी शेतकरी आपली जमिन देण्यास तयार होतील असे वाटत नाही. अतः कोणत्याही प्रकल्पासाठी भूसंपादन करतांना लाभार्थ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी.उक्त प्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा,दहीसावळी गावठाण येथील शेतक-यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ च्या चौपदरीकरणाकरिता जमिन संपादित करताना ज्या शेतक-यांची जमीन राष्ट्रीय महामार्गाच्या लगत असेल त्यांना शीघ्र सिध्द गणकामधील २९ ब या कलमाखालील कोष्टकान्वये जमिनीला योग्य दर देण्यात यावा. जेणेकरून तेथील शेतक-यांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या लगत नसणारी उर्वरित जमीन संपादित करतांना संबंधित शेतक-यांवर अन्याय होणार नाही या दृष्टीने योग्य मूल्यदर आकारून त्यांचा न्याय व योग्य मोबदला देण्याबाबत शीघ्रतेने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

परिशिष्ट एक

# मूळ विनंती अर्ज

५५८
१८/१८

परिशिष्ट-५३

विधानपरिषद
महाराष्ट्र

**श्री. सुभाष झांबड, (५)**
**वि.प.स.**

प्रति :

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

विषय :- यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहीसावळी गावठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमिन संपादीत करतांना योग्य मुल्यदर आकारुन त्याचा मोबदला मिळण्याबाबत.

मा. महोदय,

मौजे भोसा, दहीसावळी गावठान, जि. यवतमाळ या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग मौजे भोसा, दहीसावळी गावठान, जि. यवतमाळ या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता शेतजमीन संपादीत करण्यात येत असून, त्यानुसार शेतीची संयुक्त मोजणी झाली आहे व शेतजमीन अधिग्रहीत करण्यात येत आहे. सदर शेतजमीन संपादीत करण्याचे काम सक्षम प्राधिकारी यांचेकडे आहे. वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये शेतजमीनीचे स्वरुप बघता वेगवेगळे दर स्वतंत्रपणे नमूद केलेला आहे. याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमीनीसाठी विभागनिहाय प्रतिचौरस मिटरचा दर स्वतंत्रपणे नमूद केलेला आहे व याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमीनीसाठी नमूद असलेल्या प्रति चौरस मिटरचा दर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चौपदरी करण्यासाठी संपादीत होत असलेल्या हायवेवरील शेतजमीनीसाठी निश्चित करण्याबाबत स्थानिक नागरिकांची मागणी आहे. हायवे लगतच्या ५०० मीटरपर्यंत संपादीत क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मुल्य निर्धारण कार्यालयाच्या परिपत्रक नुसार त्याची अंमलबजावणी होत नाही.

तरी आपणांस विनंती आहे की, सदरचा अर्ज विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशीसह पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपला,
(सही)
( सुभाष झांबड )
वि.प.स.

मा. सभापती
सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

मा. सचिव

विनंती अर्ज समिती (अ.)

दि. ३ जुलै 2017

प्रति :

मा. सुभाष झांबड,

विधान परिषद सदस्य,

मुंबई

विषय :- मौजे भोसा, दहीसावळी गावठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदीकरणाकरीता जमिन संपादीत करतांना योग्य मुल्यदर आकारुन त्याचा मोबदला मिळण्याबाबत.

मा. महोदय,

मौजे भोसा, दहीसावळी गावठान, जि. यवतमाळ या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग मौजे भोसा, दहीसावळी गावठान, जि. यवतमाळ या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता शेतजमीन संपादीत करण्यात येत असून, त्यानुसार शेतीची संयुक्त मोजणी झाली आहे व शेतजमीन अधिग्रहीत करण्यात येत आहे. सदर शेतजमीन संपादीत करण्याचे काम सक्षम प्राधिकारी यांचेकडे आहे. वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये शेतजमीनीचे स्वरुप बघता वेगवेगळे दर स्वतंत्रपणे नमूद केलेला आहे. याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमीनीसाठी विभागनिहाय प्रतिचौरस मिटरचा दर स्वतंत्रपणे नमूद केलेला आहे व याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमीनीसाठी नमूद असलेल्या प्रांत चौरस मिटरचा दर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चौपदरी करण्यासाठी संपादीत होत असलेल्या हायवेवरील शेतजमीनीसाठी निश्चित करण्याबाबत स्थानिक नागरिकांची मागणी आहे. हायवे लगतच्या ५०० मीटरपर्यंत संपादीत क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मुल्य निर्धारण कार्यालयाच्या परिपत्रक नुसार त्याची अंमलबजावणी होत नाही.

तरी आपणांस विनंती आहे की, याकडे शासनाने लक्ष घालून स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करताना त्यांना योग्य मोबदला मिळण्याबाबत कार्यवाही व्हावी, ही विनंती.

आपले,

| नांव | गांव | मो. नंबर |
|---|---|---|
| १) चंद्रशेखर ह. चौधरी | यवतमाळ | 9764417466 |
| २) श्री विनय प्रभाकरराव काळे | यवतमाळ | 9822223230 |
| ३) श्री अजित देवीदासराव गायकवाड | यवतमाळ | 9850152367 |
| ४) श्री आनंद भवरीलाल शर्मा | यवतमाळ | 9422922422 |
| ५) श्री पद्माकरराव केशवराव टेमगे | मोंगलादेवी | 7507512985 |

आनंदराव पाटील
वि.प.स.

महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद
महाराष्ट्र

प्रति,

**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**विषय :- "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करण्याकरिता परवानगी मिळणेबाबत.**

**महोदय,**

मी, खालील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करु इच्छितो, कृपया परवानगी मिळावी, ही विनंती.

"यवतमाळ जिल्ह्यातील मौजे भोसा, दहीसावळी गावठान, जि. यवतमाळ या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग मौजे भोसा, दहीसावळी गावठान, जि. यवतमाळ या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता शेतजमीन संपादीत करण्यात येत असणे, त्यानुसार शेतीची संयुक्त मोजणी झाली असून शेतजमीन अधिग्रहीत करण्यात येत असणे, सदर शेतजमीन संपादीत करण्याचे काम सक्षम प्राधिकारी यांचेकडे असणे, वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये शेतजमीनीचे स्वरुप बघता वेगवेगळे दर स्वतंत्रपणे नमूद केलेला असणे, याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमीनीसाठी विभागनिहाय प्रतिचौरस मिटरचा दर स्वतंत्रपणे नमूद केलेला आहे व याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमीनीसाठी नमूद असलेल्या प्रांत चौरस मिटरचा दर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चौपदरी करण्यासाठी संपादीत होत असलेल्या हायवेवरील शेतजमीनीसाठी निश्चित करण्याबाबत स्थानिक नागरिकांची मागणी असणे, हायवे लगतच्या ५०० मीटरपर्यंत संपादीत क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मुल्य निर्धारण कार्यालयाच्या परिपत्रक नुसार त्याची अंमलबजावणी होत नसणे, यासंदर्भात कार्यवाही व्हावी, अशी मागणी मी, या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे."

आपला,

(आनंदराव पाटील)

परिशिष्ट दोन

# विभागाने सादर केलेली माहिती

परिशिष्ट-दोन अ

**महाराष्ट्र शासन**

**विधानमंडळ कामकाज/अतितातडीचे**

**क्रमांक**:-विमंका-२०१७/प्र.क्र.९२/अ-४
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा
राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई
दिनांक: २९ सप्टेंबर, २०१७.

फोन नं. ०२२/२२८१४००१
Email tanveer.mujawar@nic.in

प्रति,
उप सचिव, (ड-१५)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

**विषय : "यवतमाळ जिल्ह्यातील मौजा भोसा,दहीसावळी गावठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमीन संपादीत करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला मिळण्याबाबत". श्री. सुभाष झांबड, विपस यांचा विनंती अर्ज**

**संदर्भ:** १) महाराष्ट्र विधानमंडळाचे पत्र क्र.२४३७५/मविस/विपविअस/ड-१५, दि.२४.८.२०१७.
२) महाराष्ट्र विधानमंडळाचे पत्र क्र.२५८२७/मविस/विपविअस/ड-१५, दि.१८.९.२०१७.
३) महाराष्ट्र विधानमंडळाचे पत्र क्र.२६४९९/मविस/विपविअस/ड-१५, दि.२६.९.२०१७.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधिन पत्रांन्वये मंगळवार दिनांक ०३ ऑक्टोबर,२०१७ रोजी दुपारी २.३० वाजता विधानभवन मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आल्याचे कळविले आहे. सदर पत्रात नमुद केल्यांनुसार बैठकीसाठीची अद्ययावत माहितीच्या ४० प्रती यासोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

आपली,

(आ) डहाके

**( आशा डहाके )**
सहायक संचालक, नगर रचना तथा अवर सचिव

**विषय:-"यवतमाळ जिल्ह्यातील मौजा भोसा,दहीसावळी गावठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमीन संपादीत करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला मिळण्याबाबत".**
**श्री. सुभाष झांबड, विपस यांचा विनंती अर्ज**

श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की मौजा-भोसा, व मौजा दहीसावळी, ता. महागांव, जि. यवतमाळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरण करण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत शेतजमीन संपादीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सद्य:स्थितीत मौजा-भोसा, ता. महागांव येथील अंदाजे १०.३६ हे.आर जमीन संपादीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी सुमारे ७.०७ हे.आर क्षेत्राबाबतची कार्यवाही मुल्यांकनाच्या स्तरावर असून अद्याप त्यामध्ये अंतिम निवाडा सक्षम प्राधिकारी (CALA) यांचेमार्फत जाहीर करण्यात आलेला नाही. उर्वरीत ३.२९ हे.आर. क्षेत्र 3A चे आक्षेप सुनावणी करीता प्रलंबित आहे.

मौजा दहीसावळी , ता. महागांव येथील अंदाजे ८.३७ हे.आर. जमीन संपादीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. यापैकी सुमारे ४.३३ हे.आर. जमिनीच्या क्षेत्राबाबत कार्यवाही मुल्यांकनाच्या स्तरावर असून अद्याप त्यामध्ये अंतिम निवाडा सक्षम प्राधिकारी (CALA) यांचेमार्फत जाहीर करण्यातआलेला नाही. उर्वरीत ४.०४ हे.आर. क्षेत्र 3A चे आक्षेप सुनावणी करीता प्रलंबित आहे.

या प्रकल्पातील भूसंपादनाकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ व भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार अंतिम निवाडे जाहीर करण्यात येतात. भूसंपादनाचा मोबदला ठरवितांना सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व बाजारमूल्य दर तक्त्यामध्ये दिलेले जमिनीचे दर यांचा तौलनिक विचार करण्यात येतो. मोबदला ठरविताना जिरायत, हंगामी, ओलित, बागायती, अकृषीक व संभाव्य अकृषीक क्षमता यासर्व बाबी लक्षात घेऊन जमिनीचा मोबदला देण्यात येतो. सद्यस्थितीत वरील दोनही गावांमधील भूसंपादन प्रक्रीयामधील अंतिम निवाडा झालेला नाही.

सदर विनंती अर्जात नमुद हायवे लगतच्या ५०० मीटर पर्यंत संपादीत क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मुल्यनिर्धारण कार्यालयाच्या परिपत्रकानुसार त्याची अंमलबजावणी होत नाही असे नमूद कले आहे. त्या अनुषंगाने सदर परिपत्रक हे नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाचे नसून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाशी संबंधित आहे. सदर परिपत्रक हे खरेदी विक्रीचे स्टँप ड्युटी करीता लागु होते.

तथापि, अर्जदारांना निवाडा मंजूरीनंतर मोबदला मान्य नसल्यास राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत अर्जदार लवादाकडे अपील करू शकतील अशी कायद्यात तरतूद आहे.

****

परिशिष्ट - दोन ब

महाराष्ट्र शासन

विधानमंडळ कामकाज/अतितातडीचे

क्रमांक:-विमंका-२०१७/प्र.क्र.१२/अ-४
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा
राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई
दिनांक: २२.०२.२०१८.

फोन नं. ०२२/२२८३४००२
Email tanveer.mujawar@nic.in

प्रति,
अवर सचिव, (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

**विषय : "यवतमाळ जिल्ह्यातील मौजा भोसा,दहीसावळी गावठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमीन संपादीत करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला मिळण्याबाबत". श्री. सुभाष झांबड, विपस यांचा विनंती अर्ज**

संदर्भ: १) महाराष्ट्र विधानमंडळाचे पत्र क्र.४८७४/मविस/विपविअस/ड-१५, दि.२०.०२.२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधिन पत्रान्वये शुक्रवार दि.२३.०२.२०१८ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता कक्ष क्र.८०१, ८वा मजला विधान भवन मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आल्याचे कळविले आहे. सदर पत्रात नमुद केल्यानुसार बैठकीसाठीची अद्ययावत माहितीच्या ४० प्रती यासोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

आपली,

(सही)
( आशा डहाके )
सहायक संचालक, नगर रचना तथा अवर सचिव

<u>महसुल व वन विभाग/अ-४</u>

**विषय:-"यवतमाळ जिल्ह्यातील मौजा भोसा,दहीसावळी गावठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे चौपदरीकरणाकरीता जमीन संपादीत करतांना योग्य मुल्यदर आकारून त्याचा मोबदला मिळण्याबाबत".**
**श्री. सुभाष झांबड, विपस यांचा विनंती अर्ज**

श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की मौजा-भोसा, व मौजा दहीसावळी, ता. महागांव, जि. यवतमाळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरण करण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत शेतजमीन संपादीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मौजा भोसा ता. महागाव येथील अंदाजे क्षेत्र १०.३० हे.आर संपादीत होत असून राष्ट्रीयमहामार्ग अधिनियम १९५६ मधील कलम 3डी नुसार क्षेत्र ७.११ हे.आर. प्रसिध्द करण्यात आले. सदर प्रकरणी २५भूधारकांना ७.०७ हे. आर. क्षेत्राचा निवाडा दि. ०६.११.२०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे. मौजे दहिसावळी येथील अंदाजे क्षेत्र ८०१८ हे.आर. क्षेत्र संपादन करण्याची कार्यवाही सुरू असुन दि.०७.०९.२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या 3डी नुसार क्षेत्र ४.३३४५ हे.आर. क्षेत्र असुन मोजणी अहवालानुसार मौजे दहिसावळी येथील गावठाण क्षेत्र सदर रस्त्याच्या चौपदरीकरण्यासाठी संपादीत होत नाही. सदर प्रकरणी ४.३३४५ हे.आर. क्षेत्रासाठीचा निवाडा दि.०८.११.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. मौजे पोहंडूळ ता. महागांव येथील एकूण ३.४७ हे.आर. क्षेत्र संपादीत होत असून त्यात गावठाणातील अंदाजे ०.१९०७ हे.आर. क्षेत्राचा समावेश आहे. याबाबत 3डी अधिसूचना दि.२२.१२.२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

या प्रकल्पातील भूसंपादनाकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ व भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार अंतिम निवाडे जाहीर करण्यात येतात. भूसंपादनाचा मोबदला ठरवितांना सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व बाजारमूल्य दर तक्त्यामध्ये दिलेले जमिनीचे दर यांचा तौलनिक विचार करण्यात येतो. मोबदला ठरविताना जिरायत, हंगामी, ओलित, बागायती, अकृषीक व संभाव्य अकृषीक क्षमता यासर्व बाबी लक्षात घेऊन जमिनीचा मोबदला देण्यात येतो.

सदर विनंती अर्जात नमुद हायवे लगतच्या ५०० मीटर पर्यंत संपादीत क्षेत्राचे दर देण्याबाबतचा महाराष्ट्र नगर रचना व मुल्यनिर्धारण कार्यालयाच्या परिपत्रकानुसार त्याची अंमलबजावणी होत नाही असे नमूद कले आहे. त्या अनुषंगाने सदर परिपत्रक हे नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाचे नसून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाशी संबंधित असून शिघ्रसिध्द गणकाचा वापर करण्यासंदर्भात नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडून ज्यामार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत त्यांचा विचार करून मार्गदर्शक तक्त्यामधिल सूचना क्र.२९ ब प्रमाणे कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे. तथापि, अर्जदारांना निवाडा मंजूरीनंतर मोबदला मान्य नसल्यास राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत अर्जदार लवादाकडे अपील करू शकतील अशी कायद्यात तरतूद आहे.

****

परिशिष्ट तीन

# समितीच्या बैठका

## पहिली बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी दुपारी २.३० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य.व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थितीः**

(१) मा. माणिकराव ठाकरे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**विशेष निमंत्रित**

श्री. सुभाष झांबड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी महसूल व वन (वने) विभाग :-**

(१) श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव,

(२) श्री. सु. वि. गावडे, सहसचिव, भूसंपादन,

**जिल्हाधिकारी कार्यालयः-**

श्री. चंद्रकांत जाजू, उपजिल्हाधिकारी, यवतमाळ

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव (वने), उपजिल्हाधिकारी यवतमाळ व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

## दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक शुक्रवार दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती:-**

(१) मा. माणिकराव ठाकरे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स..

(३) श्री. शरद रणपिसे, वि.प. स.

**विशेष निमंत्रित**

प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी :-**

(१) श्री. विकास खारगे, सचिव, महसूल व वन (वने) विभाग

(२) श्री. सु. वि. गावडे, सह सचिव, भूसंपादन, महसूल व वन (वने) विभाग

**जिल्हाधिकारी कार्यालय:-**

(१) श्री. सुनिल महिंद्रकर, उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) नांदेड

(२) श्री. रमण जैन, उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) वर्धा

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव (वने), उपजिल्हाधिकारी नांदेड व वर्धा व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

## तिसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी ११.०० वाजता कक्ष क्र. ०२ तळ मजला, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दालन, विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :-**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स..

(३) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.

(४) श्री. शरद रणपिसे, वि.प. स.

**विशेष निमंत्रित**

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स..

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचार विनिमय करून तो संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.